# विज्ञानकथा आणि वाङ्मयचौर्य

– जयंत नारळीकर

मार्च १९८९ च्या 'साहित्य सूची'त श्री विश्वेश्वर सावदेकरांच्या शोधनिबंधावर तरुणभारतचे संपादकीय छापले होते. त्यांत मराठी विज्ञानकथा वाङ्मयातील 'उचलेगिरी'चा आवर्जून उल्लेख केला होता. विज्ञान-कथा प्रकार मराठी साहित्यात नव्याने पुढे येत आहे. वाङ्मयापाठोपाठ वाङ्मयचौर्याचा सुद्धा विकास होतो. तेव्हा त्यादृष्टीने विज्ञानकथा वाङ्मयाकडे पाहणे आवश्यक आहे.

माझा मुख्य मुद्दा मांडण्यापूर्वी एक उदाहरण देतो. शिवाजी महाराजांपासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत मराठे-शाहीवर अनेकांनी कादंबऱ्या लिहिल्या. शिवाजी–अफजलखान, बाजीराव–मस्तानी, संभाजी–कलूशा, पानिपत, रमा–माधव अशा ऐतिहासिक घटनांवर, व्यक्तींवर पुष्कळ कथा साहित्य निर्माण झाले. एकाच घटनेवर अनेकांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्या. परंतु पहिल्या कादंबरीनंतरच्या इतर कादंबऱ्यांना 'उचले-गिरी'चा छाप लागत नाही किंवा त्यांना वाङ्मय-चौर्याचा ठपका बसत नाही. कारण मूळ घटनेचा आराखडा धरून वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळी कथा-विश्वे रंगवलेली असतात.

विज्ञानकथेमध्ये ऐतिहासिक घटनेऐवजी एखादा वैज्ञानिक नियम किंवा वैज्ञानिक घटना असते. मूळ नियम वा घटना समान असली तरी त्यांवर आधारलेल्या कथा स्वतंत्र असू शकतात. सापेक्षता सिद्धांतात कालाची सापेक्षता हे मूळ तत्व धरून लिहिलेल्या कथा वेगळ्या आणि स्वतंत्र असू शकतात. 'चंद्रावर स्वारी'चे ज्यूल्स व्हर्नने उत्तम कथेत रूपांतर केले. 'मंगळावरील जीवांचे पृथ्वीवर आक्रमण' ह्या काल्पनिक घटनेतून वेल्सने सुंदर कादंबरी निर्माण केली. याचा अर्थ त्या विषयांवर आधुनिक लेखकांनी नवी विज्ञानकथा लिहू नये असा होत नाही.

विज्ञानकथेत उचलेगिरी आहे का नाही हे पाहताना केवळ मूळ वैज्ञानिक कल्पना एक आहे असे पाहून पुरणार नाही तर त्यावर रंगवलेले कथाविश्व कितीसे स्वतंत्र आहे हे आपण पाहिले पाहिजे. त्या संदर्भात साहित्यसूचीत उल्लेखलेल्या काही कथांबाबत... ज्या मी लिहिल्या आहेत... काही सांगावेसे वाटते.

त्या कथांचा उल्लेख श्री सावदेकरांनी 'सोबत' मधील एका लेखात केला होता. (संदर्भ : नागपूर येथील मराठी साहित्यसंमेलनात त्यांनी वाचलेला निबंध 'मराठी विज्ञानकथा अस्सल किती ? नक्कल किती ? जो सोबतमध्ये ऑगस्ट १९८५ मध्ये छापला गेला). त्यावर खुलासा करणारी माझी मुलाखत 'सोबत'च्या १५ सप्टेंबर १९८५ मध्ये आली होती, तो श्री. अ. पां. देशपांडे यांचा लेख वाचकांनी या लेखाबरोबर छापलेला वाचावा. पुनरूक्ती टाळण्यासाठी पुन्हा तोच खुलासा येथे देत नाही. हा लेख वाचून श्री. सावदेकरांनी, लिहिलेले पत्र श्री. देशपांडे यांनी मला दाखवले. त्यांत श्री. सावदेकर म्हणतात–

'नुकताच सोबतमधला तुमचा लेख वाचला. डॉ. नारळीकरांची मुलाखत तुम्ही फार चांगली मांडली आहे. लेख मनापासून आवडला. त्याबद्दल तुमचं अभि-नंदन करण्यासाठी मुद्दाम हे पत्र लिहितोय.'

ह्यावरून कोणीही असा निष्कर्ष काढेल की मी केलेला खुलासा सावदेकरांना मान्य आहे......कारण त्यांनी श्री. देशपांडे यांना 'त्यांचा अमुक एक मुद्दा मान्य नाही' असे लिहिले नाही म्हणून आपल्या शोध-निबंधात त्यांनी परत तीच चुकीची विधाने करावीत. याचे सखेद आश्चर्य वाटते.

शोधनिबंधाचे काही संकेत असतात. त्यांत केलेल्या विधानांची पुष्टी पुराव्यासकट व संदर्भासकट केली

पाहिजे. श्री. सावदेकरांनी हे संकेत पाळलेत का? त्यांनी हॉयेलची पुस्तके वाचलीत का? त्यातील वैज्ञानिक संकल्पनांची तुलना माझ्या कादंबऱ्यांतील संकल्पनांशी केली का? उदाहरणार्थ, 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' ह्या कादंबरीत धूमकेतूच नाही आणि माझ्या 'धूमकेतू 'कथेत धूमकेतू प्रामुख्याने आहे.

अर्थात् श्री. सावदेकर ह्या बाबतीत श्री. निरंजन घाटे यांच्या लेखाकडे बोट दाखवून मोकळे होतील. परंतु शोध निबंध लिहिणाऱ्या लेखकाला संदर्भ तपासून पहायची जबाबदारी टाळता येत नाही .. विशेषकरून जर त्यातून काही खळबळजनक निष्कर्ष काढायचा असेल तर. 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' हे त्यांनी वाचले का नाही मला माहीत नाही पण हॉयेल यांचे 'आइस' हे तर त्यांनी नक्कीच वाचले नाही...कारण ते एक वैज्ञानिक पुस्तक आहे, विज्ञान कादंबरी नाहीच!

श्री. निरंजन घाटे यांना मी पत्राने आणि प्रत्यक्ष भेटीत त्यांच्या विधानांबद्दल खुलासा मागितला होता पण तो देण्याचा त्यांनी कटाक्षाने टाळला. तेव्हा मी ह्या लेखातून श्री. सावदेकर आणि श्री. घाटे यांना जाहीर आव्हान देतो की त्यांनी हॉयेलच्या पुस्तकांतील कथानके आणि वैज्ञानिक संकल्पना आणि माझ्या पुस्तकातील कथानके आणि संकल्पना शेजारी शेजारी मांडून त्यातील साम्य दाखवावे. त्याशिवाय त्यांनी लिहिलेले निबंध हे शोधनिबंध ठरत नाहीत.

अग्रलेखात (वाङ्मय चौर्याबद्दलचा) 'सावदेकरांचा हा आक्षेप गंभीर स्वरूपाचाच म्हणावा लागेल' अशी नोंद आहे. गंभीर आरोप करताना तो सिद्ध करायची जबाबदारी ही गंभीर स्वरूपाची असते. केवळ शीर्षकांच्या साधर्म्यावरून असे आरोप करणे हा प्रकार केवळ हास्यास्पदच नव्हे तर गंभीर बेजबाबदारीचा आहे.

□

---

७०१ भास्कर बिल्डिंग कुलाबा हाऊसिंग कॉलनी
होमी भाभा रोड, मुंबई ४०০০০५.

**विचारमंथन**

# विज्ञान-कथा आणि वाङ्मयचौर्य

**मराठीतील विज्ञानकथेविषयी डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनी एक प्रबंध लिहिला आहे. या प्रबंधाला विदर्भ साहित्य संघाची 'आचार्य' ही सन्माननीय पदवी प्राप्त झाल्यानंतर 'तरुण भारत'ने त्यावर गेल्या जानेवारीत एक सविस्तर अग्रलेख लिहिला होता.**

**विज्ञानकथावाङ्मयावर मराठीत झालेल्या प्रबंधात्मक लिखाणाचा हा पहिलाच महत्त्वाचा प्रयत्न आहे.**

**मराठीतील विज्ञानकथा-लेखन कसे परभृत आहे त्या संबंधीही एका प्रकरणातून सावदेकरांनी आपल्या प्रबंधात विवेचन केले आहे. त. भा.ने आपल्या संपादकीयातून त्याबद्दल चिंता व्यक्त केली होती.**

**पुण्या-मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'साहित्यसूची' या नियतकालिकाने त.भा.च्या अग्रलेखाचे मार्च ८९ च्या अंकात पुनर्मुद्रण केले आहे.**

**सुप्रसिद्ध वैज्ञानिक व विज्ञानकथालेखक डॉ. जयंत नारळीकर यांनी या लिखाणाची दखल घेऊन दुसरी बाजू समोर आणली. ही दुसरी बाजू म्हणजेच त्यांचा हा लेख.**

मार्च १९८९ च्या 'साहित्य सूची' या नियतकालिकाच्या अंकात श्री. विश्वेश्वर सावदेकरांच्या 'शोधनिबंधावरील 'तरुण भारत'चे संपादकीय पुनर्मुद्रित झाले आहे. त्यात मराठी विज्ञानकथावाङ्मयातील 'उचलेगिरी'चा आवर्जून उल्लेख केला आहे. विज्ञानकथा हा प्रकार मराठी साहित्यात नव्याने पुढे येत आहे. वाङ्मयापाठोपाठ वाङ्मयचौर्याचा सुद्धा विकास होतो, तेव्हा त्या दृष्टीने विज्ञानकथावाङ्मयाकडे पाहाणे आवश्यक आहे.

माझा मुख्य मुद्दा मांडण्यापूर्वी एक उदाहरण देतो. शिवाजी महाराजांपासून दुसऱ्या बाजीरावांपर्यंत मराठेशाहीवर अनेकांनी कादंबऱ्या लिहिल्या. शिवाजी-अफजलखान, बाजीराव-मस्तानी, संभाजी-कलुशा, पानिपत, रमा-माधव अशा ऐतिहासिक घटनांवर, व्यक्तींवर पुष्कळ कथासाहित्य निर्माण झाले. एकाच घटनेवर अनेकांनी कथा-कादंबऱ्या लिहिल्या, परंतु पहिल्या कादंबरीनंतरच्या इतर कादंबऱ्यांना 'उचलेगिरी'चा छाप लागत नाही किंवा त्यांना वाङ्मयचौर्याचा ठपका बसत नाही. कारण मूळ घटनेचा आराखडा धरून वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळी कथाविश्वे रंगवलेली असतात.

विज्ञानकथेमध्ये ऐतिहासिक घटनेऐवजी एखादा वैज्ञानिक नियम किंवा वैज्ञानिक घटना असते. मूळ नियम वा घटना समान असली तरी त्यावर आधारलेल्या कथा स्वतंत्र असू शकतात. सापेक्षता सिद्धांतात कालाची सापेक्षता हे मूळ तत्त्व धरून लिहिलेल्या कथा वेगळ्या आणि स्वतंत्र असू शकतात. चंद्रावर स्वारी'चे ज्यूल्स व्हर्नने उत्तम कथेत रूपांतर केले. 'मंगळावरील जीवांचे पृथ्वीवर आक्रमण' हचा काल्पनिक घटनेतून वेल्सने सुंदर कादंबरी निर्माण केली. याचा अर्थ त्या विषयांवर आधुनिक लेखकांनी नवी विज्ञान कथा लिहू नये असा होत नाही.

विज्ञानकथेत उचलेगिरी आहे की नाही हे पाहताना केवळ मूळ वैज्ञानिक कल्पना एक आहे असे पाहून पुरणार नाही, तर त्यावर रंगवलेले कथाविश्व कितीसे स्वतंत्र आहे हे पण पाहिले पाहिजे. त्या संदर्भात तरुण भारतातील संपादकीयावरून साहित्यसूचीत उल्लेखलेल्या काही कथांबाबत ...ज्या मी लिहिल्या आहेत... काही सांगावेसे वाटते.

हचा कथांचा उल्लेख श्री. सावदेकरांनी पूर्वी 'सोबत'मधील एका लेखात केला होता (संदर्भ : नागपूर येथील मराठी विज्ञान साहित्य संमेलनात त्यांनी वाचलेला निबंध 'मराठी विज्ञान कथा अस्सल किती? नक्कल किती?' जो सोबतमध्ये ऑगस्ट १९८५ मध्ये छापला गेला) त्यावर खुलासा करणारी माझी एक मुलाखत 'सोबत'च्या १५ सप्टेंबर १९८५ मध्ये आली होती. श्री. अ. पां. देशपांडे यांनी घेतलेली ती मुलाखत वाचकांनी वाचावी. तो मजकूर वाचून श्री. सावदेकरांनी लिहिलेले पत्र श्री. देशपांडे यांनी मला दाखवले. त्यात श्री. सावदेकर म्हणतात-

''नुकताच सोबत मधला तुमचा लेख वाचला. डॉ. नारळीकरांची मुलाखत तुम्ही फार चांगली मांडली आहे. लेख मनापासून आवडला. त्याबद्दल तुमचं अभिनंदन करण्यासाठी मुद्दाम हे पत्र लिहितोय्.''

त्यावरून कोणीही असाच निष्कर्ष काढेल की, मी केलेला खुलासा सावदेकरांना मान्य आहे... कारण त्यांनी श्री. देशपांडे यांना 'त्यांचा अमूक एक मुद्दा मान्य नाही' असे लिहिले नाही. म्हणून आपल्या शोधनिबंधात त्यांनी परत तीच चुकीची विधाने करावीत याचे सखेद आश्चर्य वाटते.

शोधनिबंधाचे काही संकेत असतात. त्यात केलेल्या विधानांची पुष्टी पुराव्यासकट व संदर्भासकट केली पाहिजे. श्री. सावदेकरांनी हे संकेत पाळलेत का? त्यांनी हॉयेलची पुस्तके वाचलीत का? त्यातील वैज्ञानिक संकल्पनांची तुलना माझ्या कादंबऱ्यातील संकल्पनांशी केली का? उदाहरणार्थ, 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' हचा कादंबरीत धूमकेतूच नाही आणि माझ्या 'धूमकेतू' कथेत धूमकेतू प्रामुख्याने आहे.

अर्थात श्री. सावदेकर याबाबतीत श्री. निरंजन घाटे यांच्या लेखाकडे बोट दाखवून (श्री. घाटे यांनी त्यांच्या एका लेखातून पूर्वी संकल्पनाचौर्याचे विधान केले होते. —संपा.) मोकळे होतील. परंतु शोधनिबंध लिहिणाऱ्या लेखकाला संदर्भ तपासून पाहायची जबाबदारी टाळता येत नाही... विशेषेकरून जर त्यातून काही खळबळजनक निष्कर्ष काढायचा असेल तर 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' हे त्यांनी वाचले की नाही मला माहीत नाही पण हॉयेल यांचे 'आइस' हे तर त्यांनी नक्कीच वाचले नाही.... कारण ते एक वैज्ञानिक पुस्तक आहे. विज्ञान कादंबरी नाहीच!

श्री. निरंजन घाटे यांना मी पत्राने आणि प्रत्यक्ष भेटीत त्यांच्या विधानांबद्दल खुलासा मागितला होता, पण तो देण्याचा त्यांनी कटाक्षाने टाळला. तेव्हा मी हचा लेखातून श्री. सावदेकर आणि श्री. घाटे यांना जाहीर आव्हान देतो की, त्यांनी हॉयेलच्या पुस्तकातील कथानके आणि वैज्ञानिक संकल्पना आणि माझ्या पुस्तकातील कथानके आणि संकल्पना शेजारी शेजारी मांडून त्यातील साम्य दाखवावे. त्याशिवाय त्यांनी लिहिलेले निबंध हे शोधनिबंध ठरत नाहीत.

आपल्या अग्रलेखात 'सावदेकरांचा (वाङ्मयचौर्याबद्दलचा) हा आक्षेप गंभीर स्वरूपाचाच म्हणावा लागेल', अशी नोंद आहे. गंभीर आरोप करताना तो सिद्ध करायची जबाबदारीही गंभीर स्वरूपाची असते. केवळ शीर्षकांच्या साधर्म्यावरून असे आरोप करणे हा प्रकार केवळ हास्यास्पदच नव्हे तर गंभीर बेजबाबदारीचा आहे.

-जयंत नारळीकर